## दिनांक 06/04/2025

**1.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/04/2025 रोजी 22:00 वा च्या सुमारास मौजे चौक गावाचे हददीत ओमकार लॉज जवळ व सार्वजनीक रोडवर ता. खालापूर येथे फिर्यादी रा.चौक नवीन वसाहत आंबेडकर नगर ता.खालापूर व साक्षीदार हे बौध समाजाचे असुन अरोपीत हा मराठा समाजाचा आहे ते सर्वजन एकाच गावातील राहणारे आहेत आरोपीत याचा विरुध्द फिर्यादी याच्या भावाने दिलेल्या तक्रारी वरुन अॅट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल असुन तो न्याय प्रविष्ट आहे. फिर्यादी हे त्याच्या मित्रासह लग्नाची पत्रीका वाटत असतांना आरोपीत याने मागील अॅट्रोसिटी दाखल गुन्हयाचा मनात राग धरुन फिर्यादी व साक्षीदार हे बौध समाजाचे आहेत हे माहित असतांना देखील जातीवाचक शब्द सार्वजनीक ठिकानी बोलुन शिवीगाळी दमदाटी करुन फिर्यादी यास तुला जिवंत सोडनार नाही ठार मारेन अशी धमकी दिली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.115/2025, अनुसुचित जाती/जमाती अधिनियम , 1989 3(1)(r)(s),3(2)(va) , भा.न्या.सं 2023 चे 351(2),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत विभाग श्रीन धुळा टेळे सो, हे करीत आहेत.

**2.** महाड (शहर) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/04/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे महाड ता.महाड येथे आरोपीत क्र.1 ता.महाड व आरोपीत क्र 02 महसुल अधिकारी अतिरिक्त कार्यभार काम पाहत असताना फिर्यादी यांची पत्नी साक्षीदार यांनी मौजे वरडोली ता-महाड येथे सर्वे नं-298 दूययम निबंधक महाड ता-महाड यांचे कडील खरेदी दस्त अन्वये खरेदी केलेले होते याची नोंद सातबारा उतारा कडे करण्याकरीता आरोपीत क्र 01 व 02 याने फिर्यादी कडुन 3000/- रू लाचेची मागणी करून सदरची लाच आरोपीत क्र 01 यांनी स्विकारली. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र 01 व 02 दिनांक वेळ 05/04/2025 रोजी 07:09 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड (शहर)पोलीस ठाणे गुरनं.32/2025, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन 1988(संशोधन 2018) चे 07 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलिस निरिक्षक अॅन्टी करप्शन ब्यूरो रायगड अलिबाग/श्री एस व्ही भिसे हे करीत आहेत.

**3.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/02/2025 रोजी 00:00 वा ते दि. 04/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे श्री स्वामी समर्थ नगर सहकारी गहनिर्माण संस्था चिंचआळी नेरळ,

सव्र्हे नं 409/46 ता.कर्जत येथे फिर्यादी हे श्री स्वामी समर्थ नगर सहकारी गहनिर्माण संस्था चिंचआळी नेरळ,येथे नोकरीस असून संस्थेकडे असलेली जमीन सव्र्हे नं 409/46 क्षेत्र 16 गुंठे या मोकळया जागेत आरोपीत रा.चिंचआळी नेरळ ता.कर्जत याने त्याचेकडे कोणतेही सदर जागेबाबत कागदपत्र नसतांना त्या जागेवर भराव करून बांधकामासाठी लागणारे मटेरिअल टाकून अतिक्रमण केले.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं. 57/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 329(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई शेंबडे, हे करीत आहेत.

**4.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे सोमजाईवाडी, खोपोली येथील सि.स.नं.5142 व 5265 या ठिकाणी, ता.खालापुर येथे फिर्यादी रा.प्लॅट नं.801, आशियाना इन्फीनिटी, हे खोपोली नगरपरिषद कार्यालयात नोकरी करीत असुन फिर्यादी हे त्यांचे नगर रचना कार्यालय तसेच अतिक्रमण विभागातील अधिकारी व स्टाफ यांचेसह मौजे सोमजाईवाडी, खोपोली येथील सि.स.नं.5142 व 5265 या जागेतील पुर्वीच्या वहीवाटी मध्ये केलेले अनधिकृत पक्क्या भिंतीचे बांधकाम तोडून अडविण्यात आलेला रस्ता खुला करण्याची कार्यवाही करीत असतांना आरोपीत यांनी तेथे एकत्रीत जमून आरोपित क्र 02 याने त्याचे हातात एक पिवळया रंगाचा रॉकेल सद्दश्य द्रवपदार्थाचा कॅन हातात घेवून येवून भिती दाखवून कामकाज करण्यास अडथळा केला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.96/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 37(1)(3)/135 , भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 189 (1), 189(2), 189(3), 191(2), 132, 221, 223, 22 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्रीम. पूजा चव्हाण ह्या करीत आहेत.

**5.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/04/2025 रोजी 12:05 वा च्या सुमारास मौजे. मुद्रे गाव गॅलक्सी सलुन समोर कर्जत येथे फिर्यादी रा.सिल्वर कॅशकेड आपार्टमेंट तळ मजला घर क्रमांक 10 महात्मा नगर नाशिक व साक्षीदार हे कर्जत येथे येत असताना फिर्यादीची बहीण ही चालवित असलेली कार क्रं. एम.एच.15 जी.एल 8558 चा धक्का चारफाटा कर्जत येथे आरोपी चालवित असलेले कार क्रमांक एम.एच.46 सी.एच.5592 कारला लागला या कारणावरून आरोपीत यांनी संगनमत करून फिर्यादीचे बहीणीचे कारचा पाठलाग करून मुद्रे गाव गॅलक्सी सलून समोर कर्जत आडवुन तिच्या सोबत वाद करुन शिवीगाळ करुन फिर्यादी त्यांना समजावुन सागत असताना माफी मागत असताना हिरवा टिशर्ट घातलेल्या इसमाने त्याचे हातातील कडा फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी करुन शिवीगाळ करुन मूक्का मार दिला तसेच निळा टिशर्ट घातलेल्या आरोपित चालक इसमाने फिर्यादीची बहीण हिस त्याच्या उजव्यापायाची लाथ पोटत मारून मुक्कामार दिला. तसेच पाठीत बुक्या मारुन मूक्का मार दिला. तिसरा इसम यांने आई व मावशी हिस बुक्यानी तोंडावर मारुन मुक्का मार दिला.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 97/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1) 126(2)

115(2) 351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/ केशव नागरगोजे हे करीत आहेत.

**6.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/03/2025 रोजी 23:15 वा ते दि. 05/03/2025 रोजी 23:15 वा च्या दरम्यान मौजे साई गणेश सोसायटी प्लॅट नं 2 सी विंग नानामास्तर नगर कर्जत येथे फिर्यादी रा. गुरुनगर मुद्रे ता.कर्जत टेलीकॉम कॉन्ट्रॅक्टर यांच्या मालकिची एकूण 40000/- रुपये व किंमतीची ओ.टी.डी.आर.मशिन ही फिर्यादी यांचेकडे नोकरीस असलेला ईसम आरोपित रा. दैठणा पो. कुरुळा ता.कधार जि.नांदेड याने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या हेतुने स्वत:चे फायदयाकरीता चोरुन नेले आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 98/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 306 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/स्वप्नील येरुणकर हे करीत आहेत.

**7.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/12/2023 रोजी 00:00 वा ते दि. 13/01/2025 रोजी 00:00 वाच्या दरम्यान मौजे गोरेगाव पुर्व मुंबई राहते घरात, गोरेगाव, येथे महिला फिर्यादी. रा पोयनाड, अलिबाग, यांचे आरोपी क्र 01 पती, आरोपी क्र 02 सासु, आरोपी क्र 03 सासरे, आरोपी क्र 04 नणंद रा 1002,10 वा मजला रोनीत रेसिडेन्सी,नाईकवाडी, गोरेगाव पुर्व मुंबई यांनी लग्न झाले पासुन फिर्यादी यांना मारहाण व शिवीगाळ करुन मानसीक व शारीरीक त्रास देवुन छळ केला तसेच लग्नात माहेरुन मिळालेले सोन्याचे व चांदीचे दगिने कपडे व इतर किरकोळ सामान ठेवुन घेतले.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं. 32/2025, भा न्या संहिता कलम 85,115(2),352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/ शेरमकर ह्या करीत आहेत.

**8.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/04/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास महिला फिर्यादी यांच्या राहत्या घरी शिरसाड ता माणगांव येथे फिर्यादी व त्यांचे सासु सासरे यांच्या राहते घराचा दरवाजा हलकासा उघडा ठेवुन झोपले असताना फिर्यादी यांचे घरात चार अनोळखी इसम चोरी करण्याच्या उदेशाने घरात घुसले असता फिर्यादी व त्यांचे सासरे यांनी चोर चोर असा मोठयाने आवाज केल्याने सदरचे चार इसम घरातुन पळुन गेले.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं. 75/2025, भा.न्या.स.कलम 305,62,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री धनाजी काळे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 05.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 251 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,72,750/-रुपये इतका दंड आकारला आहे.